20 July 2017

॥ श्री ॥

# - ऐतरेयोपनिषद् -

## - शान्तिमंत्र -

ॐ वाङ्मे मनसि प्रतिष्ठिता।
मनो मे वाचि प्रतिष्ठितमाविरावीर्म एधि।
वेदस्य म आणीस्थः श्रुतं मे मा प्रहासीः।
अनेनाधीतेन अहोरात्रान् संदधाम्यृतं वदिष्यामि।
सत्यं वदिष्यामि। तन्मामवतु।
तद्वक्तारमवतु अवतु मामवतु वक्तारम्
अवतु वक्तारम्।
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः॥

ॐ हे परब्रह्माचे प्रथम स्मरण व वंदन. त्या सच्चिदानंद स्वरूपाला केलेली ही प्रार्थना आहे.

माझी वाणी मनामध्ये स्थित आहे. माझे मन त्या वाणीमध्ये स्थित आहे. हे प्रभो, गुरुकडून वाणीच्या सहाय्याने मला जे ज्ञान मिळते आहे. ते माझ्या मनात प्रतिस्थापित होवो. मन त्या वाणीशी एकरूप होऊ दे. (गुरूपदेश केवळ कानावर न पडता मनाशी तद्रूप होऊ दे.) मन व वाणी एक होऊन जाऊ दे. परस्परांकडून अनुगृहीत झालेली वाणी व मन आत्मज्ञानोपयोगी ग्रंथाच्या पूर्णपणे निश्चय करण्यास समर्थ होतात. या दोहोंचे आनुकूल्य असो.

आविः या शब्दाने स्वयंप्रकाशचैतन्य सांगितले जाते त्याला प्रकट (प्रकाशित) होण्यासाठी प्रार्थना केली आहे. मला प्रकट हो, माझ्यासाठी प्रकट हो. मला वेदांचे ज्ञान करून दे. मन सर्व तत्त्वप्रतिपादक ग्रंथांना आणण्यास समर्थ हो. वेदान्तिक तत्त्वज्ञान गुरूंपासून माझ्यापर्यंत आणा. आनणी - आणणे

स्थः - द्वितीय पुरुष द्विवचन (अस् धातु) वाणी व मन

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

28 THU JAN 2010 — Priority

Wk 04, 028-337

January 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

यांना विनंती केली असत्यामुळे विवचन आहे. हे जे गुरुमुखातून तत्त्व, सत्त जे मी ऐकेन ते मला कधीही सोडून जाऊ नये. मा प्रहासीः। किंवा ते माझ्याकडून विसरले न जावे. माझ्या मनात ते दृढ होऊन रहावे. त्यासाठी परिश्रम घ्यायला मी तयार आहे. या ज्ञानाचे मी अहोरात्र अध्ययन, मनन, निदिध्यासन करीत राहीन. (संदधामि) रात्रंदिवस मी या ब्रह्मज्ञानातच राहो. माझी वाणी योग्य आणि सत्यच बोलू दे. त्रिकालाबाधित सत्य भाषणच माझ्याकडून घडू दे.

हे परब्रह्म, तूच माझे रक्षण कर. म्हणजे माझे चित्त इकडे तिकडे जाऊ देऊ नकोस. तुझ्या प्राप्तीच्या ध्यास सुटू देऊ नकोस. आचार्यांचे (वक्त्याचे) रक्षण कर. त्यांच्या मुखातून सत्याचा उलगडा होईल असे सामर्थ्य त्यांना दे. व ते ग्रहण करण्याचे सामर्थ्य मला दे. प्रापंचिक आकर्षणापासून माझे रक्षण कर.

त्रिविध आधिभौतिक, आधिदैविक, आध्यात्मिक तापांपासून शांति दे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

ॐ

# ऐतरेय उपनिषद

जगद्गुरु आद्य शंकराचार्यांनी जगन्नाथपुरी येथील गोवर्धन मठासाठी निरूपणात्मक म्हणून जे महावाक्य घेतले आहे ते प्रज्ञानं ब्रह्म। हे महावाक्य याच उपनिषदातील आहे. यावरून या उपनिषदाचे श्रेष्ठत्व ध्यानात येईल.

दुसरे आणखी एक वैशिष्ट्य सांगता येते ते म्हणजे या उपनिषदाचे कर्ते आहेत ते महीदास किंवा ऐतरेय ऋषी! 'इतरा' या मातेच्या नावावरून त्यांना ऐतरेय हे नाव प्राप्त झाले. एका विद्वान ब्राह्मणाला इतर जातीच्या स्त्रीपासून झालेला हा मुलगा! हा स्वतः बुद्धिमान, आत्मज्ञानी व आदर्श आचरण असणारा असा होता. परंतु आई खालच्या जातीची होती हाच त्याचा अपराध. अर्थातच त्याला यज्ञविधीमध्ये सहभागी होण्याचा, मंत्र म्हणण्याचा अधिकार नव्हता आणि त्यामुळेच त्याला वेळोवेळी कर्मठ ब्राह्मणांकडून अपमान सहन करावा लागे. एकदा तर प्रत्यक्ष त्याच्या जन्मदात्या वडिलांनी त्याचा व त्याच्या आईचा अपमान केला. तेव्हा मनोमन दुखावलेल्या या मुलाने पृथ्वीमातेची आराधना केली. तिने प्रसन्न होऊन त्याला आशीर्वाद दिला. मुळचा बुद्धिमान असलेला हा मुलगा आता अधिकच तेजस्वी दिसू लागला. व पुढे तत्कालीन [illegible] करून त्याने ब्राह्मण ग्रंथाची रचना केली. आश्रमधर्माचे पालन करून, नीतिधर्माचे आचरण करून तो आत्मज्ञानी झाला. पुढे ११६ वर्षांचे दीर्घ आयुष्य त्याला लाभले. महीची कृपा लाभल्यामुळे त्याला महीदास असे नाव मिळाले.



© www.madhaveeraguruveer.com

या उपनिषदात सृष्टि उत्पत्तिचे वर्णन केले आहे. वास्तविक सृष्टी कशी झाली ते नेमकेपणाने मानवी बुध्दीला सांगता येत नाही. हे जरी खरे असले तरी या सृष्टीच्या आरंभाचे गूढ उकलल्याशिवाय त्याला चैनही पडत नाही. त्यामुळे अनेक मंत्रदृष्टे ऋषी तसेच अगदी आधुनिक जगातले शास्त्रज्ञ हे गूढ उकलण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्यामुळे त्यात भिन्नता आढळते. या उपनिषदात वर्णन केलेले सृष्टि आरंभाचे रहस्य काल्पनिक वाटले तरी ते सत्याच्या जास्तीत जास्त जवळ जाणारे आहे. मात्र सूक्ष्मातूनच जडाची निर्मिती झाली यात काहीच संशय नाही.

विश्वनिर्मितीपूर्वी परमात्मा एकटाच होता. त्याला स्फुरण झाले (एकोऽहं बहुस्याम्) त्याला वाटले विश्व (लोक) निर्माण करावे. त्याने अंभ, मरीची, मर, आप असे लोक निर्माण केले. त्यानंतर लोकपाल उत्पन्न करावे अशी इच्छा झाली. उदकातील पाणी आहाळून त्यातून त्याने एक पुरुष काढून त्याला पिंडाचा आकार दिला. मग त्याने तप केले. तपाच्या उष्णतेने त्या अंड्याला तोंड फुटले. त्यातून वाणी व अग्नि प्रकट झाले. मग नाकाची दोन छिद्रे त्यातून प्राण व वायु उत्पन्न झाले. त्यानंतर डोळ्यांची छिद्रे फुटली. त्यातून चक्षु व आदित्य निर्माण झाले. कानाच्या छिद्रातून श्रोत्र व दिशा निर्माण झाल्या. त्या अंड्यावर पातळ आवरण निर्माण झाले. त्यातून त्वचा व लव निर्माण झाली. त्या लवीतून औषधी व वनस्पती निर्माण झाल्या. हृदयापासून मन व चंद्रमा उत्पन्न झाला. शिश्नापासून रेत व उदक निर्माण झाले.

हे विराट पुरुषाचे वर्णन पुरुषसूक्तात आहे तसेच भागवत पुराणातही आहे.

© www.madhaveeraghuveer.com

ऋग्वेदाच्या शाकल शाखेतील ब्राह्मणामध्ये हे ऐतरेय उपनिषद आहे. यात तीन अध्याय असून पहिल्या अध्यायात तीन खंड व दुसऱ्या, तिसऱ्या अध्यायात १-१ खंड आहेत.

यात आत्मविद्येचा अभ्यास असल्याने याला आत्मषट्क असेही म्हटले जाते. याचा शांतिमंत्र वैशिष्ट्यपूर्ण असून ह्या उपनिषदाच्या अध्ययनाची ती पूर्वतयारीच म्हणावी लागेल. अत्यंत एकाग्रतेने हे उपनिषद समजावून घ्यावे लागेल.

## प्रथम अध्याय - प्रथम खण्ड

ॐ आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत् ।
नान्यत्किंचन मिषत् । स ईक्षत लोकान्नु सृजा इति ॥

हे विश्व निर्माण होण्यापूर्वी दुसरे काही नव्हते. केवळ आत्माच त्यावेळी होता. अतति इति आत्मा - सर्वत्र असणारा! त्यावेळी दुसरे हालचाल करणारे काहीच नव्हते. हा एकटाच आत्मा निर्वातपणे पसरलेला होता. सर्वत्र एकच असल्याने त्याच्याशी स्पर्धा करणारा कोणीच नव्हता त्याला असे वाटले की लोकांची रचना करावी. निमित्त, लोक - भूलोक, द्युलोक निर्माण करावे असे त्याला वाटले. तो चिद् चैतन्याने भरलेला असल्याने त्याच्याजवळ क्रियाशक्ती होतीच. अस्तित्व, ज्ञान आणि क्रियाशक्ती यांनी तो परिपूर्ण होता. सत् चित् आनंद
कार्यावरून कारणाचे अनुमान करता येते.

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

स इमान् लोकान् असृजत।
अम्भो मरीचिः मरम् आपः अदः अम्भः
परेण दिवं द्यौः प्रतिष्ठा अन्तरिक्षं मरीचयः
पृथिवी मरो या अधस्तात् ताः आपः ॥२॥

त्या आत्म्याची संकल्प शक्ती इतकी प्रचंड आहे की त्याने इच्छा करताच त्या त्या गोष्टी निर्माण झाल्या. अस्तित्वात आल्या. म्हणून या लोकांना व्याहृति म्हणतात. व्याहृति म्हणजे उच्चारण वा अभिव्यक्ती.

परमेश्वराच्या मनात जे जे आले त्या स्वरूपात ते प्रकट झाले. त्यासाठी त्याला वेगळा [illegible] लागला नाही.

अंभ लोक हा द्युलोकाच्या पलीकडे आहे. त्यात मेघ जलरूपाने भरतात. त्याचा आधार द्युलोक (स्वर्ग) आहे. द्युलोकाच्या खाली अंतरिक्ष आहे. ते मरीचि लोक आहे. आणि पृथ्वी हा मर लोक आहे. कारण त्यातील लोक मरतात. ∴ मर्त्यलोक, मृत्युलोक. पृथ्वीच्या खाली आप लोक आहे. आप म्हणजे प्राप्त करणे.

स ईक्षत इमे नु लोकाः लोकपालान् नु सृजै इति।
स अद्भ्यः एव पुरुषं समुद्धृत्य अमूर्छयत् ॥३॥

हे लोक तयार झाल्यावर लोकपाल उत्पन्न करावे असा त्याने विचार केला. (रक्षणासाठी, काळजी घेण्यासाठी) असा विचार करून त्याने त्या उदकामधूनच एक पुरुष बाहेर काढून त्याला पिंडाचा आकार दिला. म्हणजेच त्याला अवयवांनी युक्त करून मूर्तिमान बनवला.

© www.madhaveeragitveer.com

पाण्याचा धर्म जुळवण्याचा आहे. एकत्रित करण्याला आहे. पाण्यामुळेच मातीचा गोळा करता येतो, कणकेचा गोळा होतो. विष्णु विश्व उत्पत्तिसाठी नार म्हणजे पाण्यात वास करतो. नारायण होतो. त्याच्या नाभिकमळातून ब्रह्मदेवाची उत्पत्ति झाली. (विश्वउत्पत्तिसाठी)

तम् अभ्यतपत् तस्य अभितप्तस्य मुखं निरभिद्यत यथा अण्डम् मुखात् वाक् वाचोऽग्निः नासिके निरभिद्यतां नासिकाभ्यां प्राणः प्राणात् वायुरक्षिणी निरभिद्यताम् अक्षिभ्यां चक्षुः चक्षुषः आदित्यः कर्णौ निरभिद्यताम् कर्णाभ्यां श्रोत्रं श्रोत्राद् दिशः त्वङ्ग् निरभिद्यत त्वचो लोमानि लोमभ्यः ओषधिवनस्पतयो हृदयं निरभिद्यत हृदयान्मनो मनसः चन्द्रमा नाभिः निरभिद्यत नाभ्यां अपानः अपानात् मृत्युः शिश्नं निरभिद्यत शिश्नात् रेतो रेतसः आपः ॥४॥

हा विराट पुरुष रचनेच्या अंड्याप्रमाणे वर्तुळाकार परंतु अवयवहीन होता. अंडे उबवावे लागते. इथे विचाराच्या तपाने ते उबवले. याच्या आवश्यकतांचा विचार करून काय काय करायला हवे ते ठरवले. (रसना)

तपाच्या प्रभावामुळे त्या ब्रह्मांडाला तोंड फुटले. तोंड दिसू लागल्यावर त्यातून वाणी निर्माण झाली. त्या वाणीपासून अग्नि निर्माण झाला. तोंड फुटताना आवाज होतोय, ऊब असतेच. तसा अग्नि झाला.

नंतर त्या विराटाला नाकाची रंध्रे फुटली. नाकातून जायला यायला (प्राण) निर्माण झाले. त्या प्राणापासून वायु निर्माण झाला. मग त्याला डोळे फुटले. डोळ्यात दृष्टी आली. दृष्टीला प्रकाश हवा त्यासाठी आदित्य आला प्रकाश पसरला.



प्राणां बरोबरच अश्विनीकुमार

©www.madhaveeraghuveer.com

२१ जुलै २०१८

मग कानाची छिद्रे फुटली व श्रवणशक्ती निर्माण झाली. शब्द दिशांतून आपल्याकडे येतो. म्हणून मग त्यापासून दिशा निर्माण झाल्या.

पुढे त्या ब्रह्मांडाला लपेटून टाकणारी त्वचा आली त्वचेला रंध्रे आली त्यामुळे स्पर्श जाणवू लागला. त्या त्वचेवर मग लव (लोम / रोम) आली. ती औषधी वा वनस्पतींच्या रूपाने!

[ओषध म्हणजे ओज म्हणजे ऊर्जा-उष्मांक / कॅलरी.
ओषधी - एकदा धान्य देऊन संपणारे - गहू तांदूळ ज्वारी
वनस्पती - दर बहाराला फळे देणारे. बरीच वर्षे टिकणारे
आंबा, पेरू, डाळिंब इ.
ही दोन्ही शरीरपोषणासाठी आवश्यक आहेत.]

ह्यानंतर हृदय दिसू लागले. त्यापासून मन आणि मनापासून चंद्र निर्माण झाला.

मग नाभि निर्माण झाली. नाभि हे अपानवायूचे स्थान आहे. अन्नपचनाचे कार्य तिथे सुरू होते. जन्मापूर्वी जीवाला पोषण नाभिमधूनच मिळत होते. पुढे त्या वायुचे दोन भाग झाले नाभिपाशी समान व गुदापाशी अपान वायु. अपानाकडे विसर्जनाचे काम आहे. अपान हे मृत्युचे / यमाचे स्थान आहे.

मग शिश्न निर्माण झाले. सृष्टीच्या पुनरुत्पत्तिसाठी जनन हवे. जनन करण्याचे सामर्थ्य रेतामध्ये परंतु ते बाहेर टाकण्यासाठी शिश्न आहे. मूत्रविसर्जन हे त्याचे दुय्यम काम आहे. रेताचे सिंचन हे प्रधान कर्म आहे. त्या रेतापासून आप व आपापासून जीवसृष्टी निर्माण झाली.

विराटाच्या देहापासून अशा रीतीने लोकपाल व इंद्रियांच्या देवता निर्माण झाल्या व त्या त्या इंद्रियांच्या ठिकाणी काम करू लागल्या. पुढे व्यक्ती निर्माण झाल्यावर त्यांच्या त्यांच्या इंद्रियांच्या ठिकाणी राहून

© www.madhaveeraghuveer.com

March 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

*Priority*

THU FEB 2010 **4**

Wk 05, 035-330

कर्म करू लागल्या.

8 am सृष्टीचा आरंभ कसा झाला? या प्रश्नाचे उत्तर
9 ठामपणे सांगता येत नाही. आणि जोवर माणूस
या सृष्टीचा भाग म्हणून वावरतो आहे तोवर
10 सृष्टीचे मूळ चलन कसे घडले हे त्याला कळणे शक्य
नाही. बाप जिवंत असेपर्यंत मुलगा त्याच्यापेक्षा वयाने
11 मोठा होऊ शकत नाही. तसेच हे आहे.

तरीसुद्धा या प्रश्नाचे उत्तर शोधल्यावाचून
12 चैन पडत नाही. ही उत्तरे दोन प्रकारची आहेत.
एक दंतकथात्मक आणि दुसरे विज्ञानाधिष्ठित.

1 pm उपनिषद्कालात विज्ञान बाल्यावस्थेत होते, तरी
सुद्धा सांख्य दर्शनकार कपिल मुनी विज्ञानदृष्टीचा
2 पुरस्कार करणारे होते.

आताचे विज्ञान Big Bang किंवा God
3 Particle चे सिद्धांत मांडत आहे.

कोणतीही विचारसरणी आधारभूत मानली तरी
4 सूक्ष्मातून जड निर्माण झाले हे निश्चित!

ऐतरेय उपनिषदाप्रमाणेच पुरुष सूक्तात देखील
5 या विराट पुरुषाचे वर्णन आले आहे.

तस्मात् विराडऽजायत।
6 चन्द्रमा मनसो जातः चक्षोः सूर्यो अजायत।
मुखात् इन्द्रश्च अग्निश्च प्राणात् वायु अजायत॥
7 देवता यांचा अर्थ शक्तिसमूह!

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am

| इंद्रिय | व्याष्टि | समष्टि |
|---|---|---|
| (१) मुख | वाक् | अग्नि |
| (२) नासिका | प्राण | वायू |
| (३) अक्षी | चक्षु | आदित्य |
| (४) कर्ण | श्रोत्र | दिशा |
| (५) त्वचा | लोम | औषधी / वनस्पती |
| (६) हृदय | मन | चंद्रमा |
| (७) नाभी | अपान | यम / मृत्यु |
| (८) शिश्न | रेत | आप |

9 10 11 12 1 pm 2 3 4 5 6 7

© www.madhaveeraghuveer.com

## द्वितीयः खण्डः

ता एता: देवता: सृष्टा अस्मिन् महत्यर्णवे प्रापतन्
तं अशनापिपासाभ्यां अन्ववार्जत् ।
ता एनं अब्रुवन् आयतनं नः प्रजानीहि
यस्मिन् प्रतिष्ठिता अन्नम् अदाम इति ॥१॥

याप्रमाणे आत्म्याने उत्पन्न केलेल्या या देवता संसाररूपी महान समुद्रात पडल्या. पुढे आत्म्याने या पुरुषाच्या पोटी तहान-भूक उत्पन्न केली. त्या देवता आत्म्याला म्हणाल्या "आम्हाला रहायला जागा दे म्हणजे त्या ठिकाणी राहून आम्ही अन्न भक्षण करू."

व्यष्टितील ८ देवता व समष्टितील ८ देवता विश्वरूपी समुद्रात पडल्या. पण या अवाढव्य पसाऱ्यात टिकून राहणे, खाद्य मिळवणे त्यांना कठीण वाटले कारण आत्म्याने (परमात्म्याने) त्यांना तहान भुकेने युक्त केले होते, कारण या देवता जिवंत रहाण्यासाठी त्यांनी आहार घेणे आवश्यक होते. आहार हा सर्व इन्द्रियांचा असतो. पाहणे हा डोळ्यांचा, ऐकणे हा कानांचा आहारच आहे. तेव्हा या सर्व देवतांनी राहण्यासाठी घर मागितले. या सूक्ष्म इंद्रियांना स्थूल रूप हवे होते. म्हणजे त्यांना त्यांचे कार्य करणे सोपे गेले असते.

देवता हा शब्द इंद्रियांना देखील वापरतात (प्रश्नोपनिषद्



© www.madhaveelaghuveer.com

Priority



ताभ्यो गाम् आनयत् ता अब्रुवन् न वै नोऽयम् अलम् इति। ताभ्यः अश्वम् आनयत् ता अब्रुवन् न वै नोऽयम् अलम् इति॥२॥

आत्म्याने त्यांच्यापुढे गाय आणली तेव्हा त्या (देवता) म्हणाल्या - हा पिंड आम्हाला पुरेसा नाही. म्हणून त्याने त्यांच्यापुढे घोडा आणला तेव्हा त्या म्हणाल्या, हा पिंड आम्हाला पुरेसा नाही.

सर्व देवतांनी जेव्हा आयतनाची मागणी केली तेव्हा देवांनी त्यांच्यासाठी गायीचे शरीर तयार केले व त्यांना दाखवले तेव्हा देवतांनी नाराजीने त्या शरीरात वास्तव्य करायला नकार दिला. घोड्याचे शरीर देखील त्यांना पुरेसे वाटले नाही.

पुरुषसूक्तात सुद्धा याचा उल्लेख आहे.

तस्मादश्वा अजायन्त ये के चोभयादतः।
गावो ह जज्ञिरे तस्मान् तस्मात् जाता अजावयः॥

तिथे त्या यज्ञातून पक्षी, रानटी व पाळीव पशू निर्माण झाले. घोडे, गायी, शेळ्या, मेंढ्या निर्माण झाल्या.

हळूहळू जीव उत्पन्न झाले. पण या देवतांना राहण्यासाठी आणखी चांगले घर हवे होते आणि त्यांचे समाधान होईपर्यंत परमेश्वर शरीरे बनवत राहिला.

© www.madhaveeraghuveer.com

२३ जुलै २०१०

ताभ्य: पुरुषम् आनयत् ता: अब्रुवन् 'सुकृतं बत' इति। पुरुषो वाव सुकृतम्। ता अब्रवीत् यथा आयतनं प्रविशत इति॥३॥

बत - आश्चर्य, संतोष सूचक

असे करत करत शेवटी परमेश्वराने माणूस बनवला व तो त्या देवतांना दाखवला. तेव्हा त्या म्हणाल्या, "वा, वा! खूप छान! खरोखर माणसाचे शरीर हे उत्कृष्ट आहे.

या विश्वातील परमेश्वराची सर्वोत्कृष्ट रचना म्हणजे माणूस! माणसाचे मन व बुद्धी सर्वापेक्षा प्रगल्भ आहे. आपल्या मुळापर्यंत शोध घेण्याची वृत्ति केवळ माणसातच आहे.

मुळातील विराट पुरुषामध्ये ज्या ज्या शक्ती विकसित झाल्या होत्या, त्या सर्व या पुरुषाच्या शरीरात स्थित झाल्या.

अग्निर्वाग्भूत्वा मुखं प्राविशत्। वायु: प्राणो भूत्वा नासिके प्राविशत्। आदित्य: चक्षु: भूत्वा अक्षिणी प्राविशत्। दिश: श्रोत्रं भूत्वा कर्णौ प्राविशत्। ओषधिवनस्पतयो लोमानि भूत्वा त्वचं प्राविशत्। चन्द्रमा मनो भूत्वा हृदयं प्राविशत्। मृत्यु: अपानो भूत्वा नाभिं प्राविशत्। आपो रेतो भूत्वा शिश्नं प्राविशन्॥

त्या विराट ब्रह्मांडाला उबवल्यानंतर सर्वात प्रथम तोंड फुटले होते. त्यातून वाणी बाहेर पडली. त्यातून अग्नी निर्माण झाला. आता पुरुषशरीरात तो अग्नी वाणी बनून त्या शरीराच्या मुखात स्थानापन्न झाला. वाणी आणि आग यांचा परस्परसंबंध आहे. ओजस्वी वाणीमध्ये परिवर्तनाचे सामर्थ्य असते.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| February 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

विराट पुरुषाच्या नाकाच्या दोन छिद्रातून प्राण वाहू लागला. त्याचा वायू झाला. तो मानवी शरीरातील नाकात शिरला.

विराटाला डोळ्यांच्या ठिकाणी जी छिद्रे फुटली त्यातून आदित्य निर्माण झाला. तोच आदित्य मानवी देहात दृष्टी बनून डोळ्यात स्थिर झाला.

विराटाच्या कानाच्या छिद्रातून दिशा निर्माण झाल्या त्या दिशा मानवी शरीरात श्रवणशक्ती होऊन आल्या.

ओषधि-वनस्पती रोम रूप बनून त्वचेमध्ये प्रविष्ट झाल्या. मृत्यु अपान बनून नाभित शिरला. नको असणाऱ्या म्हणजेच अनावश्यक गोष्टी बाहेर टाकण्याचे काम अपान करतो. वास्तविक अपानाचे स्थान गुद आहे. परंतु पचनाचे काम नाभिपासून सुरू होते. म्हणून इथे त्याचा प्रवेश नाभिमधून होतो असे सांगितले आहे.

आप रेत होऊन शिश्नामध्ये शिरले. शिश्नाचे प्रमुख कार्य प्रजननाचे आहे. त्यासाठी शरीरातील तेज सारभूत होऊन वीर्यात येते. परंतु वीर्य बाहेर टाकण्यासाठी द्रवाची आवश्यकता असते. त्यासाठी तिथे आपाची गरज आहे.

मुखात जी रसना आहे तिच्या अधिष्ठाना वरुण आहे. प्राणांचे देव अश्विनीकुमार आहेत. ते शरीर जिवंत ठेवतात.

आपल्या ऋषींनी प्रत्येक गोष्टीचा किती खोलवर जाऊन विचार केला होता हे लक्षात येते. प्रत्येक इंद्रिय, त्यामधील शक्ती, अधिष्ठात्री देवता या सर्वांचा सूक्ष्म विचार यात केला आहे.

© www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

तम् अशनायापिपासे अब्रूताम् आवाभ्याम् अभिप्रजानीहि इति। ते अब्रवीत् एतासु वां देवतासु आभजामि एतासु भागिन्यौ करोमि इति। तस्मात् यस्मै कस्मै च देवतायै हविः गृह्यते भागिन्यौ एव अस्याम् अशनायापिपासे भवतः॥

अशना आणि पिपासा आत्म्याला म्हणाल्या की आमची काही तरी व्यवस्था कर. आम्हाला रहायला जागा दे. तेव्हा आत्मा त्यांना म्हणाला की या देवतांमध्येच तुम्हाला भाग देतो. यांच्यातच तुम्हाला भागिदार करतो. म्हणून जेव्हा कोणत्याही देवतेकरता हवि घेतला जातो त्यात अशना आणि पिपासा वाटेकरी होतात.

प्रत्येक इंद्रियाला तहान भूक आहेच. डोळ्यांना पाहण्याची, कानांना ऐकण्याची, त्वचेला स्पर्शाची भूक असते. नाकाला वासाची भूक असते.

ताटात वाढलेले भोजन हे केवळ क्षुधा शांति करत नाही तर पंच ज्ञानेंद्रियांना ती मेजवानी असते. अन्न खाण्याची इच्छा करणारा पुरुष जेव्हा त्या अन्नाकडे आदराने पाहतो तेव्हा भक्ष्य समीप आले आहे या संतोषाने त्याच्या मनातील त्याविषयीची तृष्णा शांत होते. त्याचप्रमाणे प्रिय अन्नाची वार्ता ऐकणे, त्याला स्पर्श करणे इ० प्रसंगी तृप्तीचा अनुभव येतो।

सुग्रास भोजनाप्रमाणेच रम्य दृश्याने, कर्णमधुर संगीताने, सनईच्या मंगल सुरांनी, उदबत्तीच्या गंधाने वातावरण प्रफुल्लित होते.

प्रत्येक इंद्रियाचा आहार वेगळा पण मिळणारी तृप्ती सारखीच आहे. म्हणून इंद्रियांना मिळणाऱ्या हविमध्ये भूक व तहानेला अन्नामधले तृप्ती होते.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

२५ जुलै २०१०

## तृतीय: खण्ड:

१४ मंत्र

स ईक्षत इमे नु लोकाः च लोकपालाः च
अन्नं एभ्यः सृजे इति॥ १॥

त्याने विचार केला हे लोक आणि त्यांचे रक्षण करण्यासाठी लोकपाल उत्पन्न केले. आता यांच्यासाठी अन्न उत्पन्न करावे.

अशा रीतीने १४ भुवने निर्माण केली. त्यांचे पालन करण्यासाठी अग्नि, वायु, आदित्य, दिशा, औषधी वनस्पती, चंद्रमा, मृत्यु, आप असे लोकपाल नियुक्त केले. आता त्यांच्या तहानभुकेची सोय करायला हवी. प्रत्येक प्राण्याचे व त्यातील प्रत्येकाचे अन्न भिन्न आहे. परंतु इंद्रियांना शक्ती मिळण्यासाठी काहीतरी अन्न हवे.

सः अपः अभ्यतपत्। ताभ्यः अभितप्ताभ्यः मूर्तिः अजायत।
या वै सा मूर्तिः अजायत अन्नं वै तत्॥ २॥

मग त्याने उदकाकडे पाहिले. त्या पाण्याला तापवले. त्या तापवलेल्या पाण्यामधून घन पदार्थ निर्माण झाला. तीच अन्नाची मूर्ति, तेच अन्न!

पाणी व ऊब (ऊर्जा) एकत्र आले की अन्न तयार होते. धान्य असो, कोंडा, मुंगी, फळे या सर्वांमध्ये पाणी व उष्णता यांचा संयोग असतोच. व त्यातही चालणारे, पळणारे, स्थिर असे भाग पडतात.

यत् यत् अजायत तद् तद् अन्नम्।
निर्माण झालेली प्रत्येक गोष्ट कुणाचे तरी अन्न आहे आणि प्रत्येकाला जिवंत राहण्यासाठी अन्नाची आवश्यकता असते. परमेश्वराने प्रत्येकाला भूक, तहान दिली आहे. आणि या अन्नाच्या शोधात प्रत्येकजण कष्ट करतो.

© www.madhaveelaghiveer.com

या सृष्टीतील हालचाल वाढली. अगदी मुंग्यांना सुद्धा पोषक द्रव्य मिळवण्यासाठी खटपट करावी लागते. हत्तीपासून मुंगीपर्यंत प्रत्येकजण अन्न मिळवण्याच्या प्रयत्नात असतो. मांसाहारी प्राण्यांना शिकार करावी लागते. जीवो जीवस्य जीवनम्।

Survival of the fittest — Darwin

अन्नाची गरज निर्माण झाली नसती तर या सृष्टीतील चैतन्य हरवले असते. सर्वच इंद्रियांना भूक आहे. बुद्धीला देखील नवनवीन शिकण्याची भूक आहे. जिज्ञासा, पिपासा, जिगीषा, अभीप्सा.

मात्र यातून आपल्याला हेच शिकायचे आहे की भूक ही नैसर्गिक आहे. ती असणारच. पण ती किती असावी, कशाची असावी, कशा प्रकारे भागवावी याचा विवेक असावा. त्यासाठी आपल्यातील अंतरात्म्याचा विचार घ्यावा.

दुसऱ्याची वस्तू हिसकावून घेऊन आपली भूक भागवणे ही प्रकृति नाही तर विकृति आहे. परंतु प्राणिसृष्टी याच सहजप्रवृत्तीवर चालते.

आहारनिद्राभयमैथुनं च सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम्। धर्मो हि तेषामधिको विशेषः धर्मेण हीनः पशुभिः समानः॥

मनुष्याला विवेक दिला आहे. हे शरीर म्हणजे मी नव्हे. तर माझ्या अंतरंगात जो राहतो, तो त्याचा यथायोग्य हविर्भाग घेत असतो. त्यात आपण ढवळाढवळ करू नये.

कोणत्याही परिस्थितीत आपल्या मनाची तडफड, धडपड, हसणे, रडणे याला काहीच अर्थ नाही.

यदृच्छालाभसन्तुष्टो

परमेश्वरावर दृढ श्रद्धा ठेवून त्याच्या इच्छेनुसार आपण वागू लागलो की ईश्वरी संकेत कळू लागतो कारण आपल्या मनावर, बुद्धीवर त्याचेच नियंत्रण आहे. तो आतला आवाज सतत आपल्याला सांगत असतो

२८ जुलै २०१०

13 SAT FEB 2010 — Priority

February 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

Wk 06, 044-321

पण आपल्याला त्याकडे लक्ष द्यायला वेळ नाही किंवा परत नाही म्हणून आपण तो आवाज दाबून टाकतो. परंतु याचेच दुसरे टोक म्हणजे तो सर्व काही करेल. मी स्वस्थ बसून राहीन हे ही योग्य नाही. कारण त्याने क्रिया करण्यासाठी साधन म्हणून हे शरीर आपल्याला दिले आहे. त्याला आळशी करून ठेवले तर ते निरुपयोगी ठरेल. व त्यातून तनव मन दोन्ही बिघडेल. त्यासाठी आपली प्रत्येक कृती तपासून पहावी. परिणामाकडे तटस्थपणे पहावे. चूक समजून येईल. ती दुरुस्त करावी. पाटी कोरी करावी. गणित नक्की सुटेल. ही श्रद्धा या उपनिषदातून मिळते.

(पकडण्याचा प्रयत्न करू लागले)

तत् एनत् सृष्टं पराङ्ग(अत्यजिघांसत्) तद्वाचा
अजिघृक्षत तत् न अशक्नोत् वाचा ग्रहीतुम्।
स यद् ह एनत् प्राणेन अग्रहैष्यत्
(अभिव्याहृत्य) ह एव अन्नम् अत्रप्स्यत ॥३॥

ते उत्पन्न केलेले अन्न (पुरुषाकडे जाणे म्हणजे आपला मृत्यु आहे असे जाणून) मागे जाऊन पलायन करू लागले. तेव्हा तो पुरुष त्या अन्नाला वाणीने घेऊ लागला. पण वाणीने अन्न घेण्यास समर्थ झाला नाही. जर वाणीने घेऊ शकला असता तर अन्नाचा केवळ उच्चार करून माणूस तृप्त झाला असता.

अन्नाला हाका मारून, त्याच्या नावाचा उच्चार करून काही तृप्ती मिळाली नाही. वाणीला काही अन्नाला पकडता आले नाही.

बोलाचीच कढी बोलाचाच भात
जेवूनिया तृप्त कोण झाला?

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

तत् (~~प्राणेन~~ चक्षुषा) आजिघृक्षत् (पकडण्याची इच्छा केली)
तत् न अशक्नोत् चक्षुषा ग्रहीतुं सः । यत् ह
एनत् चक्षुषा अग्रहैष्यत् दृष्ट्वा एव अन्नम् अत्रप्स्यत् ॥४॥

~~[illegible] प्राणेन~~
तत् घ्राणेन अजिघृक्षत् तत् न अशक्नोत् घ्राणेन
ग्रहीतुम् । सः यद् ह एनत् घ्राणेन अग्रहैष्यत् अभिघ्राय
ह एवम् अन्नम् अत्रप्स्यत् ॥४॥

(४) मग माणसाने त्या अन्नाला घ्राणाने घेण्याचा प्रयत्न केला परंतु तो घ्राणाने घेऊ शकला नाही. जर घ्राणाने घेऊ शकला असता तर अन्नाचा वास घेऊन मनुष्य तृप्त झाला असता.

नाकाने वास घेऊन जर भूक शांत झाली असती तृप्ती मिळाली असती तर त्याने नाकाने वास घेतला असता व समाधान मिळवले असते. परंतु तसे होत नाही. नाकाने अन्न खाताही येत नाही व पचवताही येत नाही. नाक अन्नाची सूचना देऊ शकेल. पण अन्नग्रहण व अन्नपचन त्याला शक्य नाही

(५) मग त्या अन्नाला तो डोळ्याने घेऊ लागला परंतु तो डोळ्याने घेऊ शकला नाही. जर तो डोळ्याने घेऊ शकला असता तर अन्नाकडे पाहूनच तो तृप्त झाला असता. परंतु तसे झाले नाही.

डोळ्यांनी अन्न कुठे आहे ते दिसू शकेल परंतु अन्नाचे भक्षण वा पचन डोळ्यांने शक्य नाही.



© www.madhaveeraghuveer.com

२८ जुलै २०१८

तत् श्रोत्रेण अजिघृक्षत् तत् न अशक्नोत् श्रोत्रेण ग्रहीतुम्। सः यत् श्रोत्रेण अग्रहैष्यत् श्रुत्वा एव ह अन्नम् अत्रप्स्यत् ॥६॥

नंतर पुरुषाने त्या अन्नाला कानाने ग्रहण करण्याचा प्रयत्न केला पण त्याला कानाने अन्न पकडता आले नाही. जर कानाने अन्न ग्रहण करू शकला असता तर अन्नाच्या गोष्टी ऐकूनच तृप्ती मिळाली असती.

तत् त्वचा अजिघृक्षत् तत् न अशक्नोत् त्वचा ग्रहीतुम्। सः यत् ह एनत् त्वचा अग्रहैष्यत् स्पृष्ट्वा ह एव अन्नम् अत्रप्स्यत् ॥७॥

मग त्या माणसाने त्या अन्नाला त्वचेने पकडू पाहिले, पण त्वचेने पकडता आले नाही. जर तो त्वचेने अन्नाचे ग्रहण करू शकला असता तर केवळ अन्नाला स्पर्श करूनच त्याचे पोट भरले असते.

तत् मनसा अजिघृक्षत् तत् न अशक्नोत् मनसा ग्रहीतुम्। सः यत् ह मनसा अग्रहैष्यत् ध्यात्वा ह एव अन्नम् अत्रप्स्यत् ॥८॥

© www.madhaveeraghuveer.com

तत् शिश्नेन अजिघृक्षत् तत् न अशक्नोत् शिश्नेन ग्रहीतुम्। सः यत् ह शिश्नेन एनत् अग्रहैष्यत् विसृज्य ह एव अन्नम् अत्रप्स्यत् ॥९॥

मग त्याने आपल्या शिश्नाने अन्न पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु तो धरू शकला नाही. जर तो अन्नाला शिश्नाने पकडू शकला असता तर त्यागानेच तृप्ती मिळाली असती.

तत् अपानेन अजिघृक्षत्। तत् आवयत्। सः एषः अन्नस्य ग्रहः। यत् वायुः अन्नायुः वै एषः यत् वायुः ॥१०॥

पुरुषाने मुखातील अपान वायूने अन्नाला ग्रहण करण्याचा प्रयत्न केला तेव्हा तो त्या अन्नाला पकडू शकला. हा अपान वायु अन्न ग्रहण करून शरीराचे रक्षण करतो म्हणून याला अन्नायु असेही म्हणतात. अन्न ग्रहण करून हा अन्नाला गति देतो.

अन्नम् अयते इति अन्नायुः।

अपान वायुची तीन प्रमुख कार्ये आहेत.

१. आत घेतलेला श्वास कंठापासून पुढे हृदयापर्यंत पोहोचवणे. तसेच मुखात घातलेले अन्न अन्ननलिकेतून जठरापर्यंत पोहोचवणे.

२. पचन झाल्यावर अनावश्यक भागाचे (चोथ्याचे) विसर्जन करणे. नाहीतर त्या भागाचे विष (Toxins) बनू शकते व शरीराची हानी होऊ शकते.

३. आत घेतलेला [illegible] श्वास बाहेर टाकणे.

अन्न मुखातून पोटात गेल्यावर त्याचे तीन भाग होतात. वरच्या लोण्यासारख्या सारभूत भागाचे मन बनते. ज्याला आपण अन्नाचा कस सत्त्वांश म्हणतो. त्या अन्नांशामुळे मनाची धारणा बनत असते



©www.madhaveeraghuveer.com

त्यामुळे सात्त्विक, कसदार अन्न सेवन करणारी व्यक्तीचा बौद्धिक, मानसिक विकास उत्तम रीतीने होतो. संकटाचा सामना करण्यासाठी कणखर होतो.

मधला जो अन्नाचा भाग आहे त्यामुळे शरीर बळकट होते. अस्थि, मांस मज्जा यांना पुष्टि मिळते.

आणि या सगळ्या प्रक्रियेतील चोथा उरतो त्याची विष्ठा बनते. हे जरी खरे असले तरी अन्नामध्ये चोथा असणे आवश्यक आहे. कारण अपान वायु या चोथ्याच्याच मदतीने (Fibre) अन्न पुढे ढकलत असतो. अपानामुळेच अन्नाचे ग्रहण, पचन, पोषक रसाचे वितरण व अनावश्यक भागाचे विसर्जन होत असते. प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम्।

अपान वायु जोवर कार्यरत आहे तोवर अन्नाचे पचन चांगल्या रीतीने होते. त्याचे कार्य मंदावले की भूक मंदावते, अग्निमांद्य हा दोष उत्पन्न होतो व माणूस आजारी पडतो.

अपान वायु हा पृथ्वीतत्त्वाचा द्योतक आहे, तो बलशाली आहे. महत्त्वाचा आहे.

स ईक्षत कथं नु इदं मद् ऋते स्यादिति। स ईक्षत कतरेण प्रपद्या इति। स ईक्षत यदि वाचाभिः व्याहृतं यदि प्राणेन अभिप्राणितं यदि चक्षुषा दृष्टं यदि श्रोत्रेण श्रुतं यदि त्वचा स्पृष्टं यदि मनसा ध्यातं यदि अपानेन अभ्यपानितं यदि शिश्नेन विसृष्टम् अथ कोऽहम् इति सः ईक्षत कतरेण प्रपद्ये इति।

सर्व लोकपालांची निर्मिती झाली. त्यांच्या अन्नाचीही व्यवस्था झाली. सृष्टी अनेकविध रंगरूपाने तयार झाली. परंतु तरीही यच्यात चेतना नव्हती

© www.madhaveeraghuveer.com

आता त्यांच्यात प्राण फुंकायला हवा. हे माझे सृजन आहे. त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी माझ्याशिवाय दुसरा कोण असणार?

पंचभूतांच्या शक्ती पुरेशा नाहीत. कारण प्रत्येक महाभूताची शक्ती स्वयंभू पणा अपूर्ण आहे. इतरांशिवाय तिचा विकास होत नाही. शिवाय प्रत्येक तत्त्वाला इतरांना आपल्याकडे खेचून घेण्याची स्वाभाविक प्रवृत्ति असते. आग वाढता वाढता पसरत जाते. वारा वाहायला लागला की बेभान होतो. पाण्याच्या साठ्याला बंधन घालावे लागते (तरी सुद्धा कधी कधी बांधलेले प्रयत्न व्यर्थ ठरतात) पृथ्वीला (जमिनीला) सुद्धा स्वतः वाढण्याची आतून इच्छा असते. कारण एकोऽहं बहुस्याम या संकल्पातूनच ती निर्माण झाली आहे. त्यामुळे नद्या पसरतात, तशीच पृथ्वी पसरते. नद्या उथळ होत जातात. गाळाचे प्रदेश तयार होतात. अशी सर्वत्र जमीनच झाली तर पाण्याने कुठे रहायचे? जीवन अशक्य होईल.

या सर्वांवर नियंत्रण ठेवण्यासाठी या सृष्टीमध्ये माझाच प्रवेश करावा लागेल असा ब्रह्माने विचार केला. मी त्यामध्ये प्रवेश करीन त्यामध्ये आपोआपच नियंत्रित करणारी शक्ती निर्माण होईल. अशा विचाराने परमात्म्याने या सृष्टीत प्रवेश केला व ही सर्व सृष्टी जिवंत झाली, चेतन झाली, तिला जीवन मिळाले.

परंतु प्रवेश करायचे ठरले तरी कुठून प्रवेश करायचा? कारण हे ब्रह्मांड आपल्या गर्भामध्ये मग्न होऊन गेले आहे. नरदेहात देखील इतक्या शक्ती, तहान भूक भरली आहे की मी शिरणार तरी कुठून?

तेव्हा त्याला आत जायला एक मोकळी जागा सापडली, ती जागा म्हणजे ब्रह्मरंध्र! त्या रंध्रातून त्याने



© www.madhaveeraghuveer.com

प्रत्येक जीवामध्ये प्रवेश केला. त्याबरोबर पशू चालायला लागले, पक्षी उडायला लागले. नद्या वहायला लागल्या. पर्वत एका जागी स्थिर झाले.

प्रत्येक वनस्पती, औषधी अन्नसत्व निर्माण करु लागल्या, त्यातून शरीराच्या प्रत्येक भागाला जी पाहिजे, तीच शक्ती मिळाली. सर्वांवरती नियंत्रण आहे. कुणाला कशाची किती व केव्हा भूक लागावी यावर नियंत्रण आहे.

जगात अनेक प्राणी असतात. हत्तीपासून मुंगीपर्यंत! काही शाकाहारी तर काही मांसाहारी असतात. प्रत्येकजण आपापले खाणं खातात. नियम पाळतात. माणसांप्रमाणे त्यांना चालीरीतीचे बंधन नसले तरी परमात्म्याने त्यांना नैसर्गिक बंधने ठेवली आहेत.

तोल व ताल - परमात्मा कायम शिरतो तेव्हा आपोआप मानसिक व शारीरिक नियंत्रण येते. तोच आत आहे व तोच बाहेरही आहे. त्यामुळे कायेच्या आत व बाहेर असणाऱ्या नियंत्रणात एक प्रकारचा समतोल व ताल साधला जातो.

कितीतरी गोष्टी कुणीही न सांगता, समजतात. कारण आत बाहेर काहीतरी साम्य असते. एका सूत्राचे बंधन असते. प्रत्येकातील गुण-दोष वेगळे असले तरी साम्य मात्र मुळातच आहे. वेगळेपणा जो आहे तो आपण निर्माण केलेला आहे.

आचार्यांच्या मते अभेद हेच ज्ञान आहे आणि भेद म्हणजे अज्ञान आहे. आपण भेदाच्या जगात वावरत असलो तरी आपल्या श्वासोच्छ्वासावर सुद्धा आपले नियंत्रण नाही. शरीराला आवश्यक तेवढाच प्राणवायू शरीर घेत असते.



© www.madhaveeraghuveer.com

आपली प्रत्येक इच्छा, प्रत्येक भूक त्या अंतरात्म्याला विचारून नियंत्रित करावी. भूक नैसर्गिक आहे. पण ती कशाची, किती, केव्हा लागावी व कशी भागवावी याविषयी खरे तर समान नियम आहे. आणि त्या नियमाच्या नियंता स्वतः परमेश्वर आहे. जो ब्रह्मरंध्रामधून प्रवेश करून माझ्या शरीरात राहतो आहे. आणि त्यानेच निर्माण केले आहे त्याचा तो योग्य हविर्भाग घेणार आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत मनाची तडफड, धडपड, हसणे, रडणे या कशालाही काही अर्थ नाही.

आपल्या आतल्या आवाजाचा आदर करावा. कारण आतूनच काही ईश्वरी संकेत मिळत असतात. त्या आवाजाच्या संकेताप्रमाणे आचरण करत वाटचाल करायची. तो आवाज कधीच दाबून टाकायचा नाही.

मात्र तो मार्ग दाखवेल. पण प्रयत्न मात्र आपणच करायचे आहेत. साधन म्हणून हे शरीर मिळाले आहे. त्या शरीराला आळशी करायचे नाही. प्रत्येक अवयवाचा यथायोग्य वापर करायचा आहे. प्रत्येक कृती तपासून पहायची आहे. त्रयस्थपणे त्या प्रत्येक घटनेकडे पहाता यायला हवे. चुकले असेल तर पुन्हा पाटी पुसून नव्याने गणित मांडायचे आहे. नव्या जोमाने, नव्या श्रद्धेने सुरुवात करण्याची संधी दररोज मिळत असते.

आत्मविश्वासाने पुनश्च 'हरि ओम' म्हणून आरंभ करायचा. लो. टिळक – गीतारहस्य.

ॐ श्रीं कर्माणि: ------

Birthday / Anniversary

© www.madhavraghuveer.com

३० जुलै २०१०.



हे शरीर नवद्वारांचे पुर म्हणून ओळखले जातात. परंतु या नगराचा स्वामी मुख्यद्वारानेच प्रवेश करणार. आणि मूर्धा हा सर्वश्रेष्ठ भाग आहे.

मानवी शरीरात कार्यशक्ती हळूहळू विकसित होत जातात. त्यात वाचा ही पहिली शक्ती आणि प्रजनन ही सर्वात शेवटी विकसित होते.

वाचा, प्राण, नेत्र, श्रोत्र, त्वचा, लोम, मन, अपान आणि शेवटी जननेंद्रिय व बीज विकसित होते.

सर्व अवयवांकडून मिळणाऱ्या अनुभवांचे सुसूत्रीकरण करणारे एक ज्ञानतत्त्व हवे. ते ज्ञानतत्त्व 'अहं' बनून या शरीरात प्रवेश करते.

स एतमेव सीमानं विदार्य एतया द्वारा प्रापद्यत।
सा एषा विदृतिः नाम द्वाः तद् एतद् आनन्दनम्।
तस्य त्रयः आवसथाः त्रयः स्वप्नाः अयम् आवसथः
अयम आवसथः अयम आवसथः इति ॥१२॥

मग त्याने शरीराची सीमा असणाऱ्या मस्तकाला विदीर्ण करून त्या द्वाराने तो आत आला. मस्तकावरील हाडे जिथे जुळतात तिथून (टाळू) त्याने प्रवेश केला. प्रवेश केल्याबरोबर ते दार बंद झाले.

शरीराला खरे तर ११ दारे आहेत. त्यापैकी हे विदृति द्वार / नंद द्वार आणि नाभीचे दार जन्मानंतर बंद होते म्हणून त्यांची गणना केली जात नाही.

परंतु योगी पुरुष कुंडलिनी जागृत करून सरळ या ब्रह्मरंध्रापर्यंत आणतात. प्राण या नंदद्वारातून बाहेर पडला तर सरळ ब्रह्मात विलीन होतात. पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही. हे आनंदाचे ठिकाण सामान्यांना समजत

Birthday / Anniversary नाही. केवळ योगी/ज्ञानी पुरुष या द्वाराने बाहेर पडतात.

© www.madhaveeraghuveer.com

तीन स्थाने आणि तीन स्वप्ने आहेत.
जागृतीमध्ये - उजवा डोळा
स्वप्नामध्ये - मन
गाढ झोपेमध्ये - हृदयाकाश।

या विदृति द्वाराने आत आल्यावर त्याची राहण्याची तीन ठिकाणे असतात. त्याच्या तीन स्वप्नस्थिती असतात. हे एक स्थान, हे एक स्थान आणि हे एक स्थान।

उपनिषदकारांनी कदाचित शरीरातील स्थानांना हात लावून ती ठिकाणे दाखवली असावीत. परंतु त्यांचा स्पष्ट उल्लेख यात नाही. फडकेशास्त्री -

काहींच्या मते हृदयात त्याचे विश्रांतीस्थान - शयनगृह मस्तकात त्याचे मंत्रणास्थान म्हणजेच मंत्रालय आणि भ्रूमध्यामध्ये आज्ञास्थान म्हणजे कार्यकारी शक्ती किंवा कार्यालय आहे.

श्री गोयन्दका - हृदयाकाश, परमाकाश, संपूर्ण ब्रह्मांड.
स्वामी वरदानंद - भ्रूमध्य, कंठ, हृदय
श्री शंकराचार्य - दक्षिणनेत्र, मन व हृदयाकाश.

जीवाच्या तीन अवस्था (जागृती, स्वप्न, सुषुप्ति) या ज्ञानी माणसाच्या दृष्टीने स्वप्नावस्थाच आहेत.

स जातो भूतानि अभिव्यैख्यत किमिहान्यं वावदिषदिति।
स एतमेव पुरुषं ब्रह्म ततमम् अपश्यत।
इदमदर्शमितीऽ॥ १३॥

तो झालेला (जात:) म्हणजे जीवरूपाने शरीरात प्रवेश केलेला ईश्वर भूतांनाच अभिमुख्याने - तादात्म्याने जाणता झाला. त्याने सर्वबाजूंनी, बारकाईने पाहिले. त्याला सर्वत्र एकाच परब्रह्माचे स्फुरण दिसून आले. पंचमहाभूतांनी बनलेल्या शरीरातून तेच आत्मतत्त्व विलसत असल्याचे पाहून तो आश्चर्याने म्हणाला - इथे दुसरे कोण आहे? केवळ ब्रह्मच सर आहे. अहो मी या (ब्रह्माला) पाहिले

Birthday / Anniversary

त्याने जाणले की माझ्या डोळ्यांना निर्माण करणारा, त्यांना पाहण्याची शक्ती देणारा - तसेच अन्य इंद्रियांना निर्माण करणारा, त्यांना शक्ती पुरवणारा म्हणजेच खरा 'मी' आहे. म्हणजे मीच ब्रह्म आहे. हे जाणल्यामुळे त्याला आत्मतत्त्वाचे दर्शन झाले. तो अत्यंत आनंदित झाला.

आपल्या सर्व संतांनी हाच अनुभव घेतला. याचि देही, याचि डोळा हा अनुभव घेता येतो. त्यामुळे ते अखंड आनंदसागरात डुंबत राहिले. (आनंदाचे डोही आनंदतरंग) अशी अनुभूति आली. नन्दति नन्दति नन्दत्येव।

ते ब्रह्मस्वरूप म्हणजे मी आहे हे दाखवण्यासाठी तत् किंवा असे अन्य सर्वनाम न वापरता 'इदम्' हे सर्वनाम (जवळचे) वापरले आहे.

तस्मात् इदन्द्रो नाम इदन्द्रो ह वै नाम।
तं इदन्द्रं सन्तं इन्द्र इत्याचक्षते परोक्षेण।
परोक्षप्रिया इव हि देवाः परोक्षप्रिया इव हि देवाः॥१४॥

म्हणून तो आत्मा इदन्द्र आहे. (इदम् म्हणजे हे आणि द्र म्हणजे पहाणारा - द्रष्टा) इदन्द्र हे त्याचे खरे नाव आहे. तो जरी इदन्द्र असला तरी अप्रत्यक्षपणे त्याला इंद्र म्हणून संबोधले जाते. कारण देवांना अप्रत्यक्षपणा आवडतो.

समष्टिरूप विश्व आणि व्यष्टिरूप माणूस या दोन्हींमध्ये रचनेच्या दृष्टीने साम्य आहे. लहानशा भांड्यात समुद्राचे पाणी भरले तर त्यातील गुणधर्म सारखेच असतात. तसेच मानवी व्यक्तीमध्ये विश्वात काम करणाऱ्या सर्व शक्ती लहान प्रमाणात

© www.madhaveeraghuveer.com

March 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

Priority

WED FEB 24 2010

Wk 08, 055-310

8 am असतातच. यातून आपण काय शिकायचे? तर ---
देहबुद्धीने / मीपणाने आपली शक्ती आकुंचित
9 बनली आहे. साधनाच्या सहाय्याने तो 'मी'पणा कमी
करत जाऊन आपल्या जीवाची द्वारे विश्वातील
10 शक्तींना मोकळी करून द्यायची.

ज्या मानाने विश्वातील शक्ती जीवात प्रवेश
11 करतील, त्या मानाने जीवाला व्यापकता येईल. व
त्याचे सामर्थ्य वाढेल. त्यातून अनेक सिद्धी प्रकट
12 होतील. त्यातही न अडकता हा सोहळा त्रयस्थपणे निरखावा.

मस्तकावरील भांग काढण्याची जी जागा असते
1 pm ती चिरून त्याने या शरीरात प्रवेश मिळवला. या
द्वाराला विद्धृति म्हणतात. हे आनंदाचे स्थान आहे.
2 या मार्गाने प्राण गेला तर योगी पुरुष समाधिमध्ये
आनंद भोगतात. संन्याशाच्या अंतकाळी त्याचे शिष्य
3 नारळाच्या किंवा शंखाच्या टोकाने हे द्वार उघडतात.
असा योगी पुरुष मुक्त होतो, ब्रह्मामध्ये विलीन होतो.

4 परोक्षप्रिया:- पूजनीय व्यक्तींची प्रत्यक्ष नावे कधीच
घेऊ नयेत. त्यांना आचार्य, उपाध्याय, महाराज अशा नावांनी
5 संबोधावे. गोंदवलेकर महाराज / अनंतराव आठवले - आप्पा.

आपल्याकडे देवांना उघड बोलण्याची रीत नाही.
6 थोडं झाकून ठेवण्याची पद्धत आहे. त्यामुळे कुतूहल
चाळवून तो सत्य जाणून घेण्यासाठी प्रयत्न करतो.
7 नाहीतर अतिपरिचयात् अवज्ञा होते.

खुंटीवर पगडी नाही. कोपऱ्यात काठी नाही
याचा अर्थ गृहस्वामी बाहेर गेले आहेत.

वास्तविक इथे इंद्र याचा अर्थ ब्रह्मसाक्षात्कारी
असा आहे. तो जसा श्रेष्ठ असतो, तसाच देवांचा
राजाही श्रेष्ठ म्हणून तो इंद्र आहे.

Birthday / Anniversary

शुद्धज्ञान भलत्याच्या हातात जाऊ नये यासाठी ही
आडवळणाने बोलण्याची पद्धत आहे.

© www.madhaveeraghuveer.com

३१ जुलै २०१६

ॐ

द्वितीयः अध्यायः - प्रथम खण्ड.

पुरुषे ह वा अयम आदितः गर्भो भवति। यद एतद रेतः तद एतद सर्वेभ्यो अङ्गेभ्यः तेजः सम्भूतम आत्मानि एव आत्मानं बिभर्ति। तद यदा स्त्रियां सिञ्चति अथ एतद जनयति
तदस्य प्रथमं जन्म ॥१॥

जन्माला येणारा जीव प्रथम बापाच्या ठिकाणी रेतरूपाने असतो. हे रेत त्याच्या सर्व गात्रांचे सार होय. म्हणून पुत्ररूपाने पुरुष स्वतःच जन्म घेतो. स्त्रीच्या ठिकाणी सिंचन केल्यावर पुत्ररूपाने तो जन्म पावतो. हा त्याचा प्रथम जन्म असतो.

पुरुषाने सेवन केलेल्या अन्नापासून अस्थि, मांस रस, रक्त मेद मज्जा वीर्य या क्रमाने रेतोभाव होतो म्हणूनच स्त्रीप्रमाणेच पुरुष त्याला आपल्या शरीरात धारण करत असल्याने तो गौणवृत्तीने गर्भिणीच आहे.

सप्तधातुपैकी हा शेवटचा धातु असल्याने तो चरम धातु - शरीराचे सार आहे अभिमानाचा विषय आहे

पुरुष वीर्यापासून - अस्थि नाडी मज्जा व नखे - ३½
स्त्री रजापासून - मांस त्वचा रक्त व केस - ३½
असे सात धातु तयार होतात.

पुरुषाचे सार म्हणजे शुक्र। हे तो आपल्या शरीरातच धारण करत असतो. जेव्हा त्याचे सिंचन स्त्री रजावर करतो तेव्हा गर्भधारणा होते. हा त्याचा पहिला जन्म! चैतन्य अंशाने युक्त असलेला कण म्हणजे गर्भ! आपल्या संस्कृतीत प्रत्येक गोष्टीला महत्व दिले आहे. त्याचबरोबर नियम आखून दिले आहेत त्यामुळे माणसाच्या गरजा तर पूर्ण व्हाव्यात परंतु तो स्वैर बनू नये



© www.madhaveeraghuveer.com

8 am गुरुगृही शिक्षण पूर्ण करून छात्र जेव्हा स्नातक
होऊन घरी यायला निघतो त्या विधीला 'समावर्तन'
9 असे म्हणतात. अशा वेळी गुरुजी उपदेश करतात.
सुशील सद्गुणी कन्येबरोबर विवाह करून
10 गृहस्थाश्रमामध्ये प्रवेश कर आणि गृहस्थाश्रमीची
कर्तव्ये व्यवस्थित आचरत असतानाच (कन्या) पुत्रांना जन्म
11 देऊन वंशसातत्य टिकव. प्रजातंतु छेदित होऊ
देऊ नकोस. कारण पुत्राला पित्याचा आत्माच म्हटले
12 जाते. पिताच पुत्ररूपाने जन्माला येत असतो.
आत्मा वै पुत्रनामासि।

1 pm

तत स्त्रियाः आत्मभूयं गच्छति यथा स्वम् अङ्गं यथा।
2 तस्मात् एनां न हिनस्ति। सा अस्य एतम् आत्मानम्
अत्र गतं भावयति॥२॥

3

स्त्रीच्या इतर अंगाप्रमाणेच ते तिच्याशी एकरूप
4 होते म्हणून ते तिला बाधा करत नाही. मुलाच्या
पित्याचा आत्मा आपल्या उदरात आहे असे समजून
5 ती त्या रेताचे रक्षण करते. (किंवा गुल्माप्रमाणे)
पोटात शिरलेल्या बाणादिकांच्या शल्याप्रमाणे ते
6 तिला मारत नाही, शोषत नाही. ती स्त्री स्वतःच्या
शरीरात प्रवेश केलेल्या या पुत्ररूप आत्म्याचे पालन
7 करते. त्या गर्भाला प्रतिकूल असणाऱ्या आहारादिकांच्या
त्याग करून अनुकूल आहारविहारांच्या योगाने पुष्ट करते.
अनिष्ट आहारविहाराच्या योगाने ती त्याचे अहित
करत नाही.
समर्थांची माता

Birthday / Anniversary
सीताबाई- रानावनात जाण्याचे डोहाळे

© www.madhaveeraghuveer.com

27 SAT FEB 2010

Priority

Wk 08, 058-307

| February 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

साधारणपणे शरीरात आलेली कोणतीही परकी वस्तू बाहेर फेकली जाते. Foreign Body. एखाद्या अवयवाचे Transplantation केले जाते. परंतु शरीर ते स्वीकारेलच याची खात्री नसते. परंतु गर्भधारणा झालेली स्त्री हे पतीचे वीर्य म्हणजे पतीचा आत्मा समजून त्याला आपल्याच शरीराचा एक भाग बनवते आणि त्याचे रक्षण करते. त्यामुळे तो तिला व ती त्याला कोणत्याही प्रकारची पीडा देत नाही. आपला शरीररस त्याला देऊन त्याला वाढवते. त्याची काळजी घेते.

सा भावयित्री भावयितव्या भवति। तं स्त्री गर्भं बिभर्ति सोऽग्र एव कुमारं जन्मनः अग्रे अधिभावयति। स यत् कुमारं जन्मनः अग्रे अधिभावयति, आत्मानम् एव तद् भावयति, एषां लोकानां सन्तत्या एवं सन्तता हीमे लोकास्तदस्य द्वितीयः जन्म॥३॥

गर्भाचे रक्षण करणाऱ्या स्त्रीचे रक्षण करावे. कारण ती त्या गर्भाचे धारणपोषण करते. मूल जन्मास येण्यापूर्वीच बाप त्याचे संस्कार करतो. हे जे जन्माला येण्यापूर्वीचे संस्कार करतो ते आत्म्याचे संस्कार आहेत. अशा रीतीने परंपरा सांभाळून हे लोक अविच्छिन्न टिकतात. हा त्याचा दुसरा जन्म आहे. जी स्त्री आपल्या जीवनरसाने गर्भाचे रक्षण व पोषण करते तिची काळजी पतीने व कुटुंबीयांनी घ्यायला हवी. तिचा आहारविहार व मन सांभाळायला हवे. प्रसूतिपर्यंत ती त्याला जपते. मुलाच्या जन्मानंतर मग मुलाचा पिता त्याची काळजी घेतो.

Birthday / Anniversary

© www.madhavaraghuveer.com

जातकर्म इ० संस्कार करणे, शिक्षण देणे इ० कर्तव्ये करून त्याला समर्थ बनवतो. अशा प्रकारे मनुष्याच्या वंशाचे सातत्य राखून स्वतःचेच रक्षण करत असतो. पिताच मुलाच्या, नातवाच्या, पणतवाच्या रूपाने विस्तारत असतो. त्यामुळे मुलाची काळजी घेणे, त्याच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणे हे काही उपकार नव्हे, तर या रूपाने तो स्वतःचीच काळजी घेत असतो. हा त्याचा दुसरा जन्म आहे. मुलाचा जन्म हा पित्याचा दुसरा जन्मच आहे.।

सोऽस्यायमात्मा पुण्येभ्यः कर्मभ्यः प्रतिधीयते। अथास्यायं इतर आत्मा कृतकृत्यो वयोगतः प्रैति। स इतः प्रयन्न एव पुनर्जायते तदस्य तृतीयं जन्म ॥४॥

बापाचा हा पुत्ररूप देह शास्त्रोक्त कर्मे करण्याकरता आपला प्रतिनिधि या रूपाने गृहस्थाश्रमात स्थापन करतो. त्यानंतर त्या पित्याचा हा दुसरा वृद्ध देह कृतकृत्य होऊन आयुष्याने हीन होऊन मरतो. तो वृद्ध पिता या वृद्ध देहातून निघत असतानाच स्वकर्मानुसार पुन्हा जन्म घेतो. हा त्याचा तिसरा जन्म आहे.

घरातील जी नित्य-नैमित्तिक कर्मे, यज्ञयाग या सर्वांसाठी मुलाला पित्याने प्रतिनिधित्व करून ठेवलेले. मुलाने केलेले कार्य पित्याने केल्यासारखेच असते. त्यामुळे पिता कृतकृत्य होतो. मुलाला सर्व जबाबदारी व्यवस्थित पेलू लागतो, आता पित्याचे वय होते. कालांतराने तो म्हातारा होऊन मरतो. व पुन्हा जन्माला येतो. हा त्याचा तिसरा जन्म आहे. केलेल्या कर्मांचे योग्य व वासना पूर्ण करण्यासाठी योग्य जन्म मिळतो तोच तिसरा जन्म असतो.

© www.madhaveeraghuveer.com

8 am अशा रीतीने माणूस जन्मामागून जन्म घेत असतो.
या निंद्य संसाराची निवृत्ति ज्ञानावाचून होत नाही.
9 याविषयी श्रुति एका मंत्राचा उल्लेख करते.
तद् उक्तम् ऋषिणा —
10 गर्भे नु सन् अन्वेषाम् अवेदम् अहं देवानां जनिमानि
विश्वा। शतं मा पुर आयसीः अरक्षन् अधः श्येनो
11 जवसा निरदीयम् इति। गर्भ एव एतद् शयानो
वामदेव एवम् उवाच ॥५॥

12 याविषयी ऋषीने असे म्हटले आहे — " मी गर्भात
1 pm असतानाच देवांचे सर्व जन्म जाणले. पूर्वी शेकडो
लोखंडी शरीरे माझे रक्षण करीत होती. तरीही
2 ससाण्याप्रमाणे ती वेगाने तोडून टाकून मी बाहेर
पडलो." असे वामदेव ऋषी गर्भात पडलेला असताना
3 याविषयी म्हणाले.
ऋषी म्हणतात की आत्मज्ञान केव्हाही, अगदी
4 जन्मापूर्वीही होऊ शकते. वामदेवांना ते गर्भात असतानाच
झाले. इथे देव म्हणजे अवयव किंवा शक्तिकेंद्रे आहेत.
5 द्योतनात् देवः। हे कसे आणि कुठून निर्माण
झाले? असा शोध घेत घेत मूळ स्रोतापर्यंत जाता येते
6 तसे वामदेव गेले होते.
जीव हा काम, वासना व कर्मफलबंध यांच्या
7 बंधनात अडकलेला असतो. त्यामुळे तो जन्ममरणाच्या
चक्रात फिरत असतो. हे बंध अतिशय बळकट
असतात. म्हणून त्यांना लोखंडाची पुरे म्हटले आहे.
आणि शेकडो जन्म म्हणून शतं म्हटले आहे.
परंतु हे पिंजरे, या बेड्या तोडून त्यातून बाहेर
पडण्याचे ~~काम~~ सामर्थ्य ज्ञान देते.

© www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

शास्त्रप्रचीती, गुरुप्रचीती व आत्मप्रचीती

ज्ञान संपादन केले, आत्मसात केले व पचवले की आत्मा परमात्म्याकडे झेप घेऊ शकतो.

श्येन पक्षी जसा शक्तीने वेगाने झेप घेताना सर्व बंध तोडून टाकतो तशी झेप परमात्म्याकडे घ्यायची आहे. वामदेवांचे तसेच झाले. त्यांनी स्थूल, सूक्ष्म, कारण देहांचा भेद करून शुद्ध आत्म्याचा अनुभव घेतला. मी म्हणजे अवयव नाही, शरीर नाही मन, बुद्धी, चित्त, अहंकार नाही. मी यापेक्षा निराळा आहे. या सर्वांना चालना देणारा मी स्वयंभू आहे. मी स्वप्रकाशी आहे. हा अनुभव याच लोकी, याच देही साधकाला येऊ शकतो.

आणि एकदा का आत्मसाक्षात्कार झाला की तो ओसरत नाही. देहात राहूनसुद्धा तो विदेही असतो. गुणा गुणेषु वर्तन्ते अशी त्याची अवस्था असते. त्याचा देह केवळ लोककल्याणासाठीच असतो. उरलो उपकारापुरता अशी अवस्था होते.

पक्ष्याची उपमा — विवेकचूडामणि —
मुक्ति सौधावर झेप घेणारा पक्षी।

स एवं विद्वान् अस्मात् शरीरभेदात् ऊर्ध्व उत्क्रम्य अमुष्मिन् स्वर्गे लोके सर्वान् कामान् आप्त्वा अमृतः समभवत् समभवत् ॥६॥

याप्रमाणे ज्ञान झालेला तो वामदेव ऋषि हे शरीर पडल्यावर वर जाऊन स्वर्गलोकात सर्व इच्छा तृप्त करता झाला आणि अमृत होऊन राहिला.



© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

जोपर्यंत एखाद्या गोष्टीची, विषयाची माहिती नसते, तोपर्यंत त्याची भीती वाटते. ती गोष्ट टाळण्याकडे कल असतो. भीती, त्रास, संशय या चक्रात मी अडकते. परंतु ज्या क्षणी मी ते ज्ञान मिळवते त्या क्षणी या सर्व दुःखांतून मुक्त होते.

त्याचप्रमाणे या अध्यात्ममार्गाचे आहे. मृत्यु, मोक्ष हे शब्द जेव्हा अपरिचित असतात तेव्हा त्यांचा बाऊ वाटतो. नकोसे वाटतात. मात्र गुरुमाऊलींकडून त्याचे रहस्य समजले की भीती पळून जाते. उलट त्यात रस वाटू लागतो. तो एक खेळ वाटायला लागतो. त्यात गंमत येते. या सर्व वाटचालीकडे तटस्थपणे बघताना सुद्धा आनंद घेता येतो. चिंतेतून मुक्त होता येते. त्याने मांडलेला हा खेळ आहे. तो निरनिराळी रूपे घेऊन लपतो. त्यांना शोधून काढण्यासाठी काय करावे हे समजले की उत्साह वाढतो. त्रास संपतो.

आणि तो गवसला की साधक अमृत होतो. म्हणजेच जन्म-मृत्यूच्या चक्रातून सुटतो. स्वतः प्रकाशरूप होतो. चिरंतन होतो. स्वानंदसाम्राज्याचा स्वामी होतो.

Birthday / Anniversary

© www.madhavveeraghuveer.com

३ ऑगस्ट २०१८

ॐ

## तृतीयः अध्यायः प्रथमः खण्डः

कोऽयमात्मेति वयमुपास्महे? कतरः स आत्मा येन वा पश्यति येन वा शृणोति येन वा गन्धान् आजिघ्रति येन वा वाचं व्याकरोति येन वा स्वादु चास्वादु च विजानाति ॥१॥

आम्ही ज्याची उपासना करायची तो आत्मा कोण? आम्ही ज्याला आत्मा म्हणतो तो कोण? आपण ज्याच्या सत्तेने पाहतो, ऐकतो, वास घेतो, शब्द उच्चारतो, गोड किंवा कडू जाणतो तो आत्मा होय.

वामदेवाप्रमाणेच मुक्त होण्याची जर आमची तीव्र इच्छा असेल तर त्या आत्म्याची उपासना करायला हवी हे माहित आहे. पण तो आत्मा नेमका कुठला? ज्याच्यामुळे आम्ही पाहू शकतो ऐकू शकतो वास घेऊ शकतो, बोलू शकतो, चव जाणतो त्या आत्म्याची उपासना करायची की ज्याच्यापासून ही सर्व सृष्टी निर्माण झाली, त्या आत्म्याची उपासना करायची? म्हणजेच जीवात्म्याची की परमात्म्याची? सोपाधिक आत्मतत्त्व की निरुपाधिक आत्मतत्त्व? कतरः - या पदाने दोहोंपैकी कोणते असा निर्देश केला आहे.

या शरीरात पादाग्रांच्या द्वारा अपर ब्रह्मरूप प्राण प्रविष्ट झाला आणि मूर्धा विदीर्ण करून त्या रंध्रातून परब्रह्म प्रविष्ट झाले. शरीर जिवंत राहण्यासाठी हे दोन्ही आवश्यक आहेत. म्हणून त्या दोघांनाही आत्मा म्हटले जाते. परंतु आत्मा तर एकच आहे. ज्याची उपासना करावी असा मुख्य उपास्य कोणता?

© www.madhuveeraghuveer.com

Birthday / Anniversary

8 am यदेतद् हृदयं मनश्चैतत्। संज्ञानमाज्ञानं विज्ञानं
प्रज्ञानं मेधा दृष्टि: धृति: मति: मनीषा जूति: स्मृति:
9 संकल्प: क्रतु: असु: कामो वश इति।
सर्वाणि एवैतानि प्रज्ञानस्य नामधेयानि भवन्ति॥२॥

10 हृदयात राहणारा हा आत्मा मनाचा प्रकाशक आहे.
11 जाणणे आणि वस्तु प्रकाशणे, विवेक, बुद्धी, शहाणपण,
दृष्टि, धैर्य, विचार, चिंतन, मनाची व्यग्रता, स्मृति,
12 संकल्प, निश्चय, प्राणवृत्ति, विषयतृष्णा, लोभ इ०
सर्व वृत्ति जाणिवेचेच व्यक्त प्रकार आहेत.

1 pm हृदय आणि मन हे शब्द व्यवहारात समान
अर्थाने वापरत जात असले तरी हृदय हे दाखवता
2 येते तसे मन दाखवता येत नाही. हृदय हा अवयव
Organ आहे तर मन ही शक्ती आहे.

3 या हृदयात जाणीव असते. संज्ञानम् - सम्यक्ज्ञानम्।
ही जी शक्ती म्हणजेच जाणीव वेगवेगळ्या कार्यातून
4 दिसून येते. मी जिवंत आहे, मला अस्तित्व आहे.
यालाच जाणीव किंवा संज्ञान किंवा संविद म्हणतात.

5 आज्ञानम् - आज्ञाशक्ति किंवा ईश्वरभाव, Leadership.
ही आज्ञा करण्याची शक्ती आहे. सर्व इंद्रिये जड
6 आहेत. त्यांना कुणीतरी आज्ञा करावी लागते. प्रेरणा द्यावी
लागते.

7 विज्ञानम् - भौतिक ज्ञान, विविधतेचे ज्ञान, भिन्न
वस्तूंचे भेदाचे ज्ञान (विद्या), ६४ कलांचे ज्ञान।

प्रज्ञानम् - आकलनशक्ती, स्फूर्ति, प्रतिभा, नवीन
काहीतरी चमकदार कल्पना सुचणे. नवनवोन्मेषशालिनी

वीणेवरी फिरतां तुझी चतुरा कलामय अंगुली
संगीत जन्मा ये नवे जडता मनीची भंगली
उन्मेष कल्पतरूवरी बहरून आल्या मंजिरी॥

मेधा - ग्रंथधारणसामर्थ्य, धारण करण्याची शक्ती
दृष्टी - इंद्रियांच्या द्वारा सर्व विषयांची उपलब्धि.
इंद्रियजन्य विषयज्ञान Perception. अंतर्दृष्टिसुद्धा।
धृति - धारणा, धैर्य. यामुळे सतत कार्य करणे शक्य
होते. निराशा येत नाही. मनुष्य निर्भय बनतो.
उत्साह व बळ प्राप्त होते. म्हणून चांगली कामे घडतात.
धृति व उत्साह हे जोडपे आहे. धृत्युत्साहसमन्विता
मति - मनन करण्याची शक्ती. जे समजले आहे त्याचे
मनन करणे. मनातल्या मनात साधक बाधक मुद्दे मांडणे.
निश्चय करण्याची वृत्ति.
मनीषा - मनन करण्याचे स्वातंत्र्य. निर्भय वृत्तीने
मनन करण्याची शक्ती। मनावर ताबा ठेवण्याची शक्ती।
मनसः ईषा इति मनीषा.
जूति - चित्ताला होणाऱ्या दुःखाची प्राप्ती - क्लेश.
प्रतिकूल वेदना समजणे, सहन करणे, अशुभाची चाहूल
लागणे. अस्थिर मन - व्यग्रता. Dictionary - speed, velocity.
स्मृति - स्मरण, वाचलेले, ऐकलेले अनुभवलेले आठवणे
व ते योग्य वेळी आठवणे ही शक्ती.
संकल्प - सामान्यतः ज्ञात झालेल्या रूपादिकांचे
भेद करणे. गोरा - काळा! हे करावे किंवा करू नये
असे ज्यामुळे वाटते ती ही वृत्ति!
क्रतु - दृढ निश्चय, प्रयत्न, उत्साह. काय करायचे हे
ठरवणारी शक्ती. सेतु नेच हा क्रतु श्रमाचा!
असु - प्राणशक्ति, जिजीविषा - जगण्याची इच्छा.
जीवनप्रयत्नाला निमित्त होणारी वृत्ति.
श्वसन, पचन, अभिसरण करणारी वृत्ति.
काम - जवळ नसलेल्या विषयाची आकांक्षा, तृष्णा।
वश - भोगाची, स्वामित्वाची. स्त्रीसंपर्काची इच्छा
लोकैषणा, वित्तैषणा, दारैषणा, पुत्रैषणा, प्राप्ती वा त्यागाची इच्छा।

Birthday / Anniversary

*Priority*

**March 2010**

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

8 am अंतःकरणाच्या या सर्व वृत्ति म्हणजे प्रज्ञानाची नावे आहेत. परंतु ती त्याची स्वाभाविक/साक्षात
9 नावे नाहीत तर औपाधिक नावे आहेत.

या सर्व वृत्ती म्हणजे जाणिवेच्याच कार्यशक्ती
10 आहेत. म्हणजे तीच जाणीव वेगवेगळ्या रूपांनी प्रत्ययाला येते. सर्वांचे मूळ आहे ती जाणीव. तिलाच प्रज्ञान
11 किंवा चित किंवा संविद म्हणून ओळखले जाते.

यां सर्व वृत्ती म्हणजे त्यावरील तरंग आहेत.
12 ३२ वृत्तींचा उल्लेख संख्या संकेत कोशात आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| संकल्प | वासना | इच्छा | स्मृती | धृती |
| 1 pm श्रद्धा | उत्साह | कारुण्य | | प्रेम |
| दया | कृतज्ञता | काम | लज्जा | आनंद |
| 2 प्रीती | राग | द्वेष | लोभ | मद |
| मत्सर | क्रोध | | | |

3 याशिवाय अनेक शक्ती भूतमात्रांमध्ये असतात.

या देवी सर्वभूतेषु बुद्धिरूपेण संस्थिता।
4 नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः॥

याप्रमाणे चेतना, लज्जा, आनंद, भीती, बुद्धि, निद्रा
5 क्षुधा, छाया, शक्ति, तृष्णा, शांति, जाति, क्षांति, श्रद्धा कांति, लक्ष्मी, वृत्ति, स्मृति, दया, तुष्टि, भ्रांति, तसेच
6 मातृ वात्सल्य या रूपाने ही शक्ती रहात असते.

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

April 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

Priority

MON MAR 2010 **8**

Wk 10, 067-298

8 am एष ब्रह्म एष इन्द्र एष प्रजापतिः एते सर्वे देवा
इमानि च पंचमहाभूतानि पृथिवी वायुराकाश
9 आपो ज्योतींषीति एतानि, इमानि च क्षुद्रमिश्राणीव
बीजानि, इतराणि चेतराणि चाण्डजानि च जारुजानि च
10 स्वेदजानि च उद्भिजानि च अश्वाः गावः पुरुषाः हस्तिनो
यत्किंचेदं प्राणि जङ्गमं च पतत्रि च यच्च स्थावरं।
11 सर्वं तत् प्रज्ञानेत्रं प्रज्ञाने प्रतिष्ठितं प्रज्ञानेत्रो लोकः
प्रज्ञा प्रतिष्ठा प्रज्ञानं ब्रह्म ॥३॥

12 महावाक्य

प्रज्ञान हेच ब्रह्म आहे, हा इंद्र आहे, प्रजापति आहे,
1 pm हा सर्व देवता आहे. पृथ्वी, वायु, आकाश, पाणी, तेज इ०
पंचमहाभूते क्षुद्र, मिश्र, व दुसरी अनेक बीजे, अंडज,
2 जारज, स्वेदज, उद्भिज जीवप्राणी, गाई, घोडे, माणसे, हत्ती.
तात्पर्य- जे जे काही सजीव, चालणारे, उडणारे आणि
3 निश्चल आहेत ते सर्व प्रज्ञाननेत्र म्हणजे प्रज्ञानाच्या सत्तेने
वागणारे आहेत. प्रज्ञान हाच त्यांचा आधार आहे. सर्व
4 जगत प्रज्ञाननेत्र आहे. म्हणून प्रज्ञान हे ब्रह्म होय.
केवळ आतील वृत्तीच नाही तर बाहेरील गोष्टी
5 देखील याच प्रज्ञानाची, जाणीवेची रूपे आहेत.
सर्वं खल्विदं ब्रह्म।

6 विज्ञानघनाने ज्याने प्रवेश केला ते ब्रह्म हेच आहे.
इन्द्र म्हणजे तेच आहे. प्रजापती तोच आहे. विराट तोच
7 आहे. त्यापासून निर्माण साकार अवयव व त्यांच्या
देवताही तोच आहे. ही पंचमहाभूते म्हणजे तोच आहे
छोटी छोटी सूक्ष्म मिश्रित बीजे व अन्य जे काही
आहे ते त्याचीच रूपे आहेत. चारी खाणी म्हणजे तोच आहे
अंडज, स्वेदज, जारज, उद्भिज इ० घोडे गायी, हत्ती, माणूस
हे सर्व हलणारे प्राणी, पंख असणारे पक्षी तोच आहे.
Birthday / Anniversary याशिवाय जे स्थिर अचर आहे ते देखील तोच आहे.

© www.madhaveeraghuveer.com

हे सर्व प्रज्ञानेत्रच आहे. नी - नेणे यापासून नेत्र हा शब्द बनला आहे.

ही प्रज्ञा / जाणिव / चैतन्यच प्रत्येक अणुरेणुला उत्पत्ति-स्थिती-लयाकडे नेत असते. दगडात सुध्दा तेच चैतन्य आहे. परंतु सामान्य दृष्टीला ते दिसत नाही.

ज्ञानेश्वर माऊलींना जड अशा भिंतीत चैतन्य दिसले, एकनाथ महाराजांना गाढवामध्ये ते प्रज्ञानघन दिसले. प्रल्हादाला खांबात परमेश्वर दिसला.

या सृष्टीतील प्रत्येक अणु जिवंत आहे. चैतन्याने भरलेला आहे. ते चैतन्य म्हणजेच ब्रह्म.

'प्रज्ञानं ब्रह्म' हा सिध्दांत ऐतरेयाने जगाला दिला आहे. ते ऋग्वेदाचे महावाक्य आहे.

आणि म्हणूनच या चराचराची आपण उपासना करतो. केरसुणी, भूमीला नमस्कार, सूर्य, गाय, अग्नि, तुळस, वड, बैल, नाग, कावळा हे सर्व आम्हाला वंदनीय आहेत.

चुकून जरी कुणाला पाय लागला तरी आम्ही नमस्कार करतो कारण तो परब्रह्माचा अनादर असतो.

स एतेन प्रज्ञेन आत्मना अस्मात् लोकात् उत्क्रम्य अमुष्मिन् स्वर्गे लोके
सर्वान् कामान् आप्त्वा अमृतः समभवत्
अमृतः समभवत् ॥४॥

तो वामदेव प्रज्ञानाच्या योगाने या लोकातून वर स्वर्गलोकात गेला आणि सर्व इच्छा पूर्ण होऊन अमर झाला.

तत्व — प्रज्ञान म्हणजे शुध्द जाणिव हेच आत्म्याचे (ब्रह्माचे) खरे स्वरूप होय.



© www.madhavaraghuveer.com

व्यवहार - ज्याप्रमाणे आपल्या देहाला जाणीव अगदी आपादमस्तक व्यापून असते त्याचप्रमाणे मी या सर्व विश्वाला व्यापून आहे. अज्ञानाने आपण आपल्याला संकुचित करतो व केवळ देहापुरतीच जाणीव अनुभवतो आणि जोपर्यंत देह म्हणजे मी अशी भावना असते तोवर अनेक कष्ट, सुखदुःखे भोगावी लागतात.

हळूहळू मीपणा विसरून जाणीव व्यापक होऊ लागते तसतसे आपण सुखदुःखाच्या पलीकडे जातो. चित्ताला शुद्ध केले की जाणीव व्यापक होत जाते. मग हे चित्त गढूळ कशामुळे होते? तर कामवासना, राग, पैशाची हाव, लोभ या विकारांमुळे चित्त मलीन होते.

या प्रबळ शत्रूंवर मात केली तरच चित्त शुद्ध होऊ शकते. म्हणून या चार चांडाळांना भगवंताच्या पायी वाहून टाकावे. भगवंताच्या अस्तित्वानेच केवळ त्यांचा नाश होईल. म्हणून रात्रंदिवस भगवंताचे अनुसंधान ठेवून वागावे. आपोआप जाणीव व्यापक व शुद्ध होईल.

नामदेवाने हेच जाणले की या सृष्टीतील प्रत्येक कण न कण प्रभुयुक्त आहे. प्रभु हाच सर्वांचा आधार, प्रतिष्ठा आहे. हे कळल्यानंतर ते कृतार्थच झाले. या कोशातून वर जाऊन सर्वांत वरच्या स्थितीप्रत पोहोचले. आता त्यांच्या कोणत्याही कामना वासना उरल्या नाहीत. ते अमर झाले म्हणजेच जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटले.

स्वतःमधील व या विश्वामधील सर्वत्र भरून राहिलेल्या चैतन्याचा अनुभव जो कोणी घेईल तो हा सर्वश्रेष्ठ परमानंद, परम शांती प्राप्त करू शकेल. मानवी जीवनाचे हेच खरे ध्येय आहे.

ॐ

## – ऐतरेय उपनिषदाचे सिंहावलोकन –

ऋग्वेदातील ऐतरेय आरण्यकाच्या ४ थ्या अध्यायाचे तीन खंड आणि ५ व्या व ६ व्या अध्यायाचा १-४ खंड यात आहे. आणि ७ व्या अध्यायातील एक खंड हा शांतिरूप आहे.

निद्रा जशी स्वप्नाला उत्पन्न करते तशी माया ही जगद् भ्रांतिला उत्पन्न करते. आत्मा स्वतः निर्विकार असला तरी त्याने मायावृत्तीने ईक्षण-आलोचन केले.

विचारपूर्वक सर्व लोकांना उत्पन्न केले, आणि लोकपालांना उत्पन्न करण्यासाठी त्याने विराट देह निर्माण केला. त्याच्या गोलकांमध्ये (Centers) चक्षु, कर्ण, घ्राण इ. मध्ये देवता निर्माण केल्या. विराटदेहरूप

त्या उत्पन्न केलेल्या देवता नंतर, महासंसार-सागरात पडल्या. प्रभुने त्या देहाला क्षुधा-तृषा यांनी युक्त केले. यानंतर अन्नभोगासाठी चार प्रकारची (अंडज, स्वेदज, उद्भिज, जरायुज) असंख्य शरीरे उत्पन्न करून त्यात त्या विराटदेहातील देवतांना यथायोग्य स्थानी प्रवेश करावयास सांगितले. क्षुधा-तृषा यांना विराटशरीरात स्वतंत्र स्थान नव्हते. म्हणून ईश्वराने त्यांना त्या देवतांमध्येच भागीदार केले. त्यामुळे देवतांच्या विषयोपभोगाने त्या तृप्त होऊ लागल्या.

© www.madhaveeraghuveer.com